महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९ वा | मंगळवार, दि. ०५ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (टूवीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा

## ओबीसी आरक्षणासह, नव्या प्रभागरचनेला सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने नव्या प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसींसाठी निवडणूकीत २७ टक्के आरक्षणाला मंजुरी दिली आहे. न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली आहे.

या संदर्भातील महत्त्वाची सुनावणी आज (ता.४) सर्वोच्च न्यायालयात पार पडली.

सर्वोच्च न्यायालयाने नवी प्रभाग रचना तसेच ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या आहेत. त्यामुळे ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे राज्यातल्या रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना वेग येणार आहे.

या सुनावणीत, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, वॉर्ड (प्रभाग) रचना ठरवण्याचा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे. राज्य सरकारने ठरवलेल्या प्रभाग रचनेनुसारच पुढील निवडणुका घेतल्या जातील. तसेच, २७ टक्के ओबीसी



आरक्षणाला जे आव्हान दिले गेले होते, त्यावर न्यायालयाने सुनावनी दरम्यान सांगितले की, "पूर्वीच्या आरक्षणासह निवडणुका घेण्यास आम्ही आधीच परवानगी दिली आहे." त्यामुळे आता निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यास अडथळा राहिलेला नाही.

**प्रभाग रचनेवरील वाद अखेर संपला**

गेल्या काही काळात नवीन की जुनी प्रभाग रचना यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. महायुती सरकारने सत्तेत आल्यानंतर प्रभाग रचना बदलली होती. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारने त्यात फेरबदल केले. नंतर पुन्हा एकनाथ शिंदे सरकार आल्यावर आणखी एकदा रचना बदलण्यात आली. या सततच्या बदलांमुळे निवडणुका रखडल्या होत्या. आता मात्र न्यायालयाच्या निर्णयामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.

**राज्यातील निवडणुकांना लवकरच गती येणार**


राज्यात अनेक महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नवीन प्रभाग रचना लागू करून निवडणुकीची तयारी सुरू झाली होती. मात्र, या नव्या रचनेला विरोध करत काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. त्यामुळे काही काळासाठी निवडणुकीची प्रक्रिया थांबवावी लागली होती. आता न्यायालयाने या सर्व याचिका फेटाळल्याने, राज्य सरकार लवकरच निवडणुका जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करणार आहे.

**ओबीसींना २७ टक्के आरक्षणामुळे राजकीय सहभाग वाढणार**

या निर्णयामुळे ओबीसीच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा मार्ग मोकळा झाला आहे. बराच काळ ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित होता आणि त्यामुळे समाजात संभ्रम होता. आता मात्र ओबीसींनाही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळणार असून, राजकीय निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढणार आहे.

## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा सोलापूर दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर लढा देण्याकरिता दिशा ठरविण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे बुधवारी ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता सात रस्ता येतील शासकीय विश्रामगृह येथे दाखल होणार आहेत. जरांगे पाटील यांच्या आगमनानंतर डाक बंगला




येथे दिवसभर सोलापूर शहर व जिल्ह्यातील मराठा आंदोलनातील सर्व मराठा बांधवांची ते भेट घेणार आहेत .तरी सोलापूर जिल्ह्यातील मराठा बांधवांनी या बैठकीस उपस्थित राहून सहकार्य करावे असे अहवान सकल मराठा समाज शहर व जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

आंदोलनामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मराठा बांधवांसोबत मनोज जरांगे पाटील हे दिवसभर चर्चा करण्याकरिता सोलापूरमध्ये उपलब्ध असणार आहेत. समाज बांधवाकडून करण्यात येणाऱ्या सूचनाबाबत ते चर्चा करतील आणि नंतर सर्वांच्या विचारविनयोगानंतर निर्णय जाहीर केला जाणार आहे.

## भीमा नदी व उजनी धरणातील जलप्रदूषण रोखा- खा.धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** भीमा नदीतील वाढत्या जलप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील राजसिंह मोहिते पाटील यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (CPCB) चेअरमन वीर विक्रम यादव यांची नवी दिल्ली येथे भेट घेत निवेदन दिले. या बैठकीदरम्यान त्यांनी नदीप्रदूषणामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय आणि जनस्वास्थ्याशी संबंधित गंभीर समस्यांवर सविस्तर चर्चा केली.याशिवाय, उजनी धरण व सोलापूर परिसरात दूषित जल वापरामुळे उद्भवणाऱ्या



आरोग्याच्या समस्या, तसेच त्यावर तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी केली.

खासदार मोहिते पाटील यांनी सादर केलेल्या निवेदनात, भीमा नदीत घरगुती व औद्योगिक सांडपाण्याचा थेट विसर्ग होत असल्याने मानव आरोग्य, शेती, पशुधन आणि पर्यावरणावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांबाबत लक्ष वेधले. त्यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण आणि सोलापूर येथील सांडपाणी शुद्धीकरण केंद्रे (STP) पूर्ण क्षमतेने कार्यक्षम आहेत की नाही, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, औद्योगिक प्रदुषित जल तपासणीची कार्यप्रणाली, जलप्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कारवाई करावी याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नदीच्या जलगुणवत्तेच्या अहवाल सार्वजनिक उपलब्ध करावा यासंदर्भात CPCB कडून स्पष्ट व सविस्तर माहितीची मागणी केली.

या चर्चेच्या पार्श्वभूमीवर CPCB चे चेअरमन वीर विक्रम यादव यांनी या समस्येची गंभीर दखल घेतली असून, येत्या जानेवारी २०२६ मध्ये भीमा नदी व उजनी धरणातील जल प्रदूषणाबाबत केंद्रीय प्रदूषण मंडळाचे तज्ञांकडून पाहणी चाचणी करून समस्येच्या निराकरणासाठी ठोस पावले उचलली जातील असे सांगितले.

# आ.अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जल्लोष !

## ५२ जेसीबीतून उधळला फुलांचा वर्षाव

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर येथील जनसंपर्क कार्यालय येथे वाढदिवस मोठा जल्लोष संपन्न झाला.

विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने ५२जेसीबीतून फुलांची उधळण करत क्रेनचा मोठा हार आ. पाटील यांना कार्यकर्त्यांच्या वतीने घालून वाढदिवस साजरा करण्यात आला.



यावेळी आशीर्वाद देण्यासाठी आलेले ह.भ.प.ज्ञानेश्वर जळगावकर महाराज म्हणाले की; अभिजीत पाटील याचे सर्वच क्षेत्रात मोठं कार्य उभा आहे. ज्यांनी विठ्ठलाच्या मूतीर्चे संरक्षण केलं त्यांचा आशीर्वाद आमदार पाटील यांच्या कुटुंबाला मिळालेला आहे. अगदी कमी वेळात जिल्हा नव्हे तर महाराष्ट्रात स्वतःची स्वकर्तुत्वावर ओळख निर्माण करणारे आ.अभिजीत पाटील आहेत. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न अधिवेशनात मांडून आमदार अभिजीत पाटील हे लोकप्रिय बनलेले आहेत. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसानिमित आयोजित सत्काराला उत्तर देताना आ. पाटील म्हणाले की; मागील वाढदिवसाचे वेळी काही जणांनी आमच्यावर टीका टीपणी केली. स्वतः जेसीबी आणायचा स्वतःच फुल उधळून घ्यायची .परंतु तुम्हाला माणसं कुठून येणार? हा प्रश्न तुमच्यासमोर आहे. मात्र मी माझ्या जिवाभावाची माणसं जोडलेली आहेत. त्यांच्याच जोरावर मतदाररूपी आशीर्वाद देऊन, आज विधानसभेमध्ये निवडून आलो आहे.त्यामूळे तुम्ही सर्वांनी मला निवडून दिले असताना, विधानभवनात पहिल्यांदा जात असताना, विधानसभेच्या पहिल्या पायरीवर डोकं ठेवून, मंदिराप्रमाणे प्रवेश केला. तीन अधिवेशनामध्ये पहिल्या अधिवेशनामध्ये पंचावन्न, दुसऱ्या अधिवेशनात साठ तर पावसाळी अधिवेशनात एकशे सतरा प्रश्न विचारले असून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न विधानभवनामध्ये मांडले. त्या जोरावर तालिकाध्यक्ष पदावर देखील कामकाज पाहण्याची संधी मिळाली.

मागील वाढदिवसाला चार महिन्यात आमदार होतो म्हणून सांगितलं परंतु आमदार झालेल्यांना एका वक्तव्यामुळे दीड वर्ष विधानभवनाच्या बाहेर बसावं लागलं. म्हणून वक्तव्य जबाबदारीने करावे लागते. अशी खोचक टीकाही आ. पाटील यांनी केली..

यावेळी प्रस्ताविक प्रा.तुकाराम मस्के सर यांनी केले. यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सदस्य संभाजीराजे शिंदे, अनिल सावंत, माजी जिल्हाधिकारी गोकुळ मवारे, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, राहुल शहा, डॉ.बी.पी रोंगे सर, विठ्ठल कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलाताई रोंगे, बालाजी मलपे, अरूण कोळी, सतीश शिंदे, किरण घाडगे, धनंजय कोताळकर, प्रशांत शिंदे, श्रीनिवास बोरगावकर, राहुल साबळे, राजन थोरात, महादेव धोत्रे, आदित्य फत्तेपुरकर, देवानंद गुंड पाटील, सुधीर भोसले, दिगंबर सुडके, सतीश चव्हाण, प्रथमेश पाटील, अमर सुर्यवंशी, मदनसिंह पाटील, युवती अध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, अनिता पवार, सावली बंगाळे यासह विठ्ठल कारखान्याचे संचालक मंडळ, पक्षाचे पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
निरामय पॅरालिसिस सेंटर
प्रत्येक जिल्ह्यात फ्रेंचाइजी देणे आहे
फ्रेंचाइजी का घ्यावी?
- No Royalty.
- कमीत कमी Operating Cost.
- तुलनेने सर्वाधीक नफा मिळेल.
- अनुभवी डॉक्टर
- अनुभवी स्टाफ
- कमीत कमी गुंतवणुक

फ्रेंचाइजी साठी आजच संपर्क करा
9503310568

प्रवेश ! प्रवेश !! प्रवेश !!!
दि ग्रेट मौलाना अबुल कलाम आझाद मायनॉरिटी एज्युकेशनल ट्रस्ट
मौलाना आझाद पॉलिटेक्निक
गट नं. ३६/१अ, होटगी-कुंभारी रोड, मु.पो. होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
(Approved by A.I.C.T.E. New Delhi, Recognized by Govt. of Maharashtra : Affiliated to MSBTE, Mumbai)
DTE Inst. Code : 6810 • MSBTE Inst. Code : 1611 • Email : azadsolapur@gmail.com
Admissions Open !
Against possible vacant seat after CAP Round
CAP रजिस्ट्रेशन केलेल्या व न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी !
Courses
- मेकॅनिकल इंजिनिअरींग
- इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग
- इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलि.इंजि.

प्रवेश पात्रता
प्रथम वर्ष : १० वी पास
द्वितीय वर्ष : १२ वी Science / ITI Pass
* प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी तत्काळ संपर्क करा.
* प्रवेशाची अंतिम दि. १४ ऑगस्ट २०२५
मायनॉरिटी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अंतर्गत शैक्षणिक फी माफ
अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या.
बस सुविधा उपलब्ध
प्राचार्य डॉ.सर्फराज नजीर शेख
B.E.(E&TC), ME (ELN), Ph.D. (ECE)
Contact
9403295556 / 9975272442

## संपादकीय

# शिक्षणाचा विचका

राजस्थानातील एका अत्यंत महत्त्वाच्या आणि सगळ्यांत गंभीर आणि धक्कादायक घटनेकडे दुर्लक्ष झाले. राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात शाळेच्या एका जीर्ण झालेल्या इमारतीचे छप्पर कोसळले आणि त्यात सात लहान मुलांचा मृत्यू झाला. ज्यांनी आपली मुले या घटनेत गमावली त्यांचा आक्रोश ही अन्य लोकांसाठी अथवा सरकारी व्यवस्थेसाठी केवळ काही क्षण अथवा तास पाहावी आणि ऐकावी लागेल अशी घटना आहे, असे मानण्याइतपत कोडगेपणा आता सगळ्यांच्याच अंगात भिनला आहे.

आपल्याला सोपवलेले काम पूर्ण मन लावून करावे, निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करावे असे ज्या शाळेत शिकवले जाते त्या शाळेत जर निरागस मुले मृत्यू पावत असतील तर हे शिकवणारे आणि शिकवण्यासाठी त्यांना आणणारे यांना सगळ्यांनाच आपापल्या जबाबदर्यांचा विसर पडला आहे हे स्पष्ट आहे. आम्ही धोकादायक शाळांची जी यादी मागितली होती त्यात कथित शाळेचे नावच नव्हते असे अधिकर्यांनी म्हटले. एवढे रूक्ष उत्तर त्यांना सात मुलांच्या अकाली मृत्यूतून सुटका करून देण्यासाठी पुरेसे ठरणार असल्याचे सध्यातरी दिसते.

ते एकवेळ हात झटकून मोकळे होतील किंवा तसे करू शकतील, मात्र ज्या शाळेत ती मुले शिकत होती तेथील शिक्षकांना हा धोका जाणवला नाही? या शिक्षकांना स्वतःच्या जीवाचीही भीती वाटली नाही? ते शाळेत नक्की जात होते ना ज्ञानदानाच्या कामाला की त्यांचा बहुमूल्य वेळ त्यांनी अन्य महत्त्वाच्या कामांसाठी राखून ठेवला होता? घटना एका ठिकाणी घडली असली तरी पहिली नाही आणि आपली जाड कातडी जोपर्यंत संबंधितांकडून बाजूला सारली जात नाही तोवर शेवटचीही नसणार आहे. देशातील प्रत्येक राज्यात हीच अवस्था थोड्याफार फरकाने आहे.

देशाला महाशक्ती करण्याच्या चर्चा होतात, त्या व्हाव्यात त्याला विरोध नाही मात्र आज आपण नेमके कुठे उभे आहोत याकडेही लक्ष देण्याची तसदी वरपासून खालपर्यंत सगळ्यांनी घ्यायला हवी. भारतातील अनेक ग्रामीण शाळांना पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. इमारतींची खराब स्थिती, मूलभूत सुविधांचा अभाव याचा शैक्षणिक वातावरणावर नकारात्मक परिणाम होतो इतपत ठीक होते, मात्र आता सुरक्षिततेवरही त्याचा परिणाम होतो आहे. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागातील स्थिती अधिक खराब आहे. अनेक शाळांमध्ये स्वच्छ पाणी, शौचालये, वीज आणि पुरेशा वर्गखोल्या यासारख्या मूलभूत गोष्टी नाहीत. त्यातून गळती वाढते किंवा अपार संघर्ष करत मुलींना शिक्षण घ्यावे लागते.

गळकी छप्परे, पडण्याच्या बेतात आलेल्या भिंती आणि अपुरी जागा अशा अवस्थेत शिक्षण सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्यातच आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करून स्वतःचा विकास करवून घ्यायचा असतो. जोपर्यंत येथील विद्यार्थी मोठ्या शहरांत आणि व्यापक जगात दाखल होत नाहीत तोपर्यंत चालून जाते, पण ज्यावेळी ते स्पर्धेमध्ये उतरतात त्यावेळी त्यांना आपण किती मागे आहोत याची जाणीव होते आणि यात त्यांचा दोष नसतो. अर्थात ज्या विद्यार्थ्याला याचे म्हणजे शिक्षणाचे महत्त्व समजले असते त्यालाच याची जाणीव होते. परिस्थितीमुळे आणि त्याच्या भागात सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीनतेचा त्याला फटका सहन करावा लागतो; मात्र त्याला थांबता येत नाही.

सगळ्या अडथळ्यांवर मात करत त्याला दुप्पट वेगाने आणि प्रसंगी जीवाच्या आकांताने धावावे लागते. पात्र आणि लायक शिक्षक मिळत नाहीत. शिक्षकांना आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडत अन्यत्र फरफटत जाण्याची तयारी नसते. विद्यार्थी हा त्यांचा केंद्रबिंदूच नसल्याचे बहुतांश शिक्षकांच्या वर्तणुकीत आढळून येते. सगळेच शिक्षक या वर्गात मोडतात असे नाही, मात्र चांगल्या शिक्षकांची आणि व्रत म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारल्याची संख्या आता खरेच किती राहिली असेल याचे संशोधन प्रत्येकाला सहज करता येऊ शकते. अशा एकूणच निराशाजनक वातावरणात शिक्षणाबद्दल आपण अनुकूलता निर्माण करत आहोत की प्रतिकूलता याचाही गांभीयार्ने विचार करण्याची वेळ आली आहे.

माझ्या शहरात अथवा माझ्या तालुक्यात मी असले काही पाहिले नाही म्हणून सगळीकडे सर्वकाही सुरळीत सुरू आहे आणि अत्यंत उच्च दर्जाच्या वातावरणात सगळे शिकत आहेत आणि येथे तयार होणारे विद्यार्थी उद्या राष्ट्राचे भविष्य घडवणार आहेत या स्वप्नरंजनात आताच्या काळात कोणीही न राहिलेलेच बरे. झालावाडसारखी एखादी घटना घडली की राज्य प्रशासन फतवा काढून तपासणीचे आदेश जारी करते. काही राज्ये जागरूक असतात. अन्य राज्यात एखादी घटना घडली की ते तातडीने आपल्या राज्यात पुढाकार घेत स्वतःहून तपासणीची मोहीम सुरू करतात. मात्र त्यात प्रामाणिकपणाने काम करण्यापेक्षा दिखावाच अधिक असतो. बरे सरकार प्रामाणिक असेलही तरी खाली काम करणारी मंडळी पाट्या टाकणार नाहीत याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही.

याकरताच या आव्हानांना तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, पुरेशी शिक्षण संसाधने उपलब्ध करणे आणि पुरेशा संख्येने पात्र शिक्षक मिळणे अथवा मिळवणे महत्त्वाचे आहे. दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच व्यावहारिक कौशल्ये शिकवण्यासाठी अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. सर्व मुलांना, त्यांची पार्श्वभूमी काहीही असो, दर्जेदार शिक्षण सुरक्षित वातावरणात उपलब्ध व्हावे. अन्यथा विकसित भारताचा संकल्प आणि त्यासंदर्भात केलेल्या घोषणा या केवळ आणि केवळ सोपस्काराचा भाग ठरेल.

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे जयंती निमित्त जिल्हा परिषदेत अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद मध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची 105 वी जयंती जिल्हा परिषदेमध्ये साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणेत आले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे,समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, राज्य उपाध्यक्ष गिरीष जाधव, कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष दिनेश बनसोडे, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर, प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, सहा लेखाधिकारी उमाकांत राजगुरु, प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, संतोष जाधव, रामदास गुरव, भीमाशंकर कोळी, शंकर चलवदे,सुशीत चाबुकस्वार, मकरंद बनसोडे, प्रणेश ओव्हाळ, व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKV) अंतर्गत ‘प्रति थेंब अधिक पिक’ (PDMC)

## शाश्वत सिंचनासाठी आधुनिक उपाययोजना



राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKV) ही केंद्र सरकार पुरस्कृत योजना असून, तिचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे ‘प्रति थेंब अधिक पिक’ (Per Drop More Crop – PDMC). या योजनेचा उद्देश म्हणजे सुक्ष्म सिंचनाच्या माध्यमातून पाण्याचा कार्यक्षम वापर, शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवणे आणि जलसंपत्तीचे संरक्षण करणे.

**योजनेचे उद्दिष्टे**

- सुक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर करून सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे.
- अधिक पाणी लागणाऱ्या पिकांसाठी (ऊस, भात, केळी इ.) काटेकोर पाणी नियोजन करून सुक्ष्म सिंचनाचा अवलंब.
- सिंचनासोबत खत व्यवस्थापन करणे.
- जलस्तर खालावलेल्या क्षेत्रांमध्ये सुक्ष्म सिंचनास प्रोत्साहन.
- सौरपंप बसवलेल्या शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचनासाठी प्रोत्साहन.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सिंचन प्रणालीचा प्रसार.
- कुशल व अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध करून देणे.

**लाभ घेण्याची प्रक्रिया**

**टप्पा माहिती**

1. नोंदणीः महाडीबीटी पोर्टलवर (krishi.maharashtra.gov.in) शेतकऱ्याची नोंदणी
2. अर्जः "सिंचन साधने व सुविधा" पयार्यातर्गत ‘सूक्ष्म सिंचन’साठी अर्ज
3. कागदपत्रे : सातबारा, आठ-अ, आधार, बँक पासबुक, सिंचन स्रोताचा पुरावा, जात प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास)
4. पूर्व-मंजुरीः अर्ज छाननीनंतर कृषी विभागाकडून पूर्व-मंजुरी पत्र
5. खरेदी मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून BIS मानांकन असलेली प्रणाली खरेदी
6. देयक सादरीकरण बिल व कागदपत्रे तालुका कृषी कार्यालयात सादर
7. पाहणी व अनुदान कृषी अधिकारी पाहणी करतात; DBT द्वारे अनुदान जमा

**पात्रता निकष**

- शेतजमीनः महाराष्ट्रातील रहिवासी, स्वतःच्या नावावर जमीन असलेली, फॉर्मर आयडी आवश्यक.
- सिंचन स्रोतः विहीर, तलाव, नदी, कूपनलिका इ. स्रोताचा पुरावा आवश्यक.
- क्षेत्र मर्यादाः वैयक्तिक शेतकऱ्यांसाठी साधारणतः ५ हेक्टरपर्यंत.
- पूर्वीचा लाभः ७ वर्षांनंतर पुन्हा लाभ घेता येतो.
- गुणवत्ता निकषः इक्र मानांकन असलेली प्रणालीच ग्राह्य.

टीपः अनुदानाचे प्रमाण निवडलेल्या प्रणालीवर आणि शेतकऱ्याच्या प्रवर्गावर अवलंबून असते. अचूक माहितीसाठी स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

**महत्त्वाचे मुद्दे**

- अनुदान मिळवण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी अनिवार्य.
- शेतकऱ्याचे बँक खाते आधारशी जोडलेले असणे आवश्यक.
- मान्यताप्राप्त पुरवठादारांकडूनच खरेदी करणे आवश्यक.
- सिंचन प्रणालीची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच अनुदान वितरित होते.

**संपर्क**

अधिक माहितीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी / जिल्हा कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

# सोलापूरच्या विकासासाठी अजित पवारांचे मोठे योगदान - किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विजापूर रोडवरील मोतीबाग येथील श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर हे एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे हे मंदिर भगवान शिव आणि सिध्दरामेश्वर यांना समर्पित आहे सोलापूर शहराच्या मध्यभागी असलेल्या या मंदिराला खूप मोठा प्राचीन इतिहास आणि धार्मिक महत्त्व आहे याच मंदिराच्या सुशोभीकरण कामासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकायार्ने प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून नागरिक स्थानिक स्वराज्य संस्था परीक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरिक सेवा व संहिता पुरविणे सन २०२४-२५ या हेड अंतर्गत श्री रेवणसिद्धेश्वर महाराज मंदिर परिसर सुशोभीकरण कामासाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला या सुशोभीकरण कामाचे शुभारंभ पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्या प्रमुख उपस्थितीत ईच्छा भगवंताची सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे सर्वेसर्वा मार्गदर्शक लक्ष्मण मामा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली या कामाचे शुभारंभ करण्यात आले याप्रसंगी माजी नगरसेवक श्रीनिवास कोंडी, सिद्धाराम चाकोते, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी,माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, मंदिराचे पुजारी सिद्धाराम शिंगारे, ज्येष्ठ नागरिक शिवराया बुक्कानुरे मामा, श्रीमंत सुरवसे काका, राहुल हत्ती, मल्लू जाधव, चंदू माने गवळी ,संभाजी सुरवसे, बसवराज पाटील, प्रज्वल जाधव, संजू भडंगे, सोनू तळभंडारे, बसवराज आळंदीकर, अजय चव्हाण, यश माने, अभिषेक बिराजदार, अमर रबकवी,प्रकाश चव्हाण, वीरेश केंगार, अशोक बिराजदार राजू मारुती वनस्कर, शोभा गायकवाड, सुनीता बिराजदार मावशी, प्रमिला स्वामी, संगीता गायकवाड आदींची उपस्थिती यावेळी होती. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार राष्ट्रवादी प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी केले.प्रारंभी पालिका आयुक्त डॉ. ओंबासे, धर्मराज काडादी आणि उपस्थित मान्यवरांनी श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसराचे पाहणी करून श्री रेवणसिद्धेश्वर महाराजांच्या पूजनाने या मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचे फलकाचे उद्घाटन यावेळी धार्मिक विधिवत पूजन करण्यात आले. तसेच यावेळी श्रावण मास निमित्त पारंपारिक वाद्यासह दर कुंभार वेस येथून रविवारी श्री रेवणसिद्धेश्वर पियी पालखी सोहळा मोतीबाग विजापूर रोड येथे आगमन होत असते याच पालखी सोहळ्याचे मनोभावे दर्शन घेऊन उपस्थित मान्यवरांनी रेवणसिद्धेश्वर महाराजांचे आशीर्वाद घेतले. दरम्यान सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वांच्या पावन नगरीत शहराच्या मध्यभागी असलेल्या श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर हे एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे श्रावण मास निमित्त लाखो भक्त दर्शनासाठी मंदिरात येत असतात मंदिर परिसरात भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मंदिर परिसर सुशोभीकरण आणि सोलापूर शहराच्या अन्य विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून मिळावी यासाठी आपण पाठपुरावा केला होता तत्काळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासाठी ७ कोटी रुपये मंजूर केले यामध्ये श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसर सुशोभीकरण साठी ५० लाख रुपयांचा निधीची तरतूद त्यांनी केला. याच कामाचे आज शुभारंभ करण्यात आले श्रावण मास निमित्त मोठ्या प्रमाणात भक्तगण हे दर्शनासाठी येत असतात अत्यंत पवित्र असे हे धार्मिक स्थळ आहे भक्तांसाठी परिसरात सुलभ शौचालय, परिसरात दिवाबत्ती, ड्रेनेज व अन्य कामे मार्गी लागावे तसेच प्रामुख्याने या परिसरात रस्त्याचा प्रश्न मार्गे लावावा आणि मंदिर परिसरात असलेल्या विहिरीची दुरुस्ती, सुरक्षेच्या दृष्टीने विहिरीला जाळी बसवणेसाठी पालिका आयुक्तांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे आणि सोलापूर शहराच्या विकासासाठी अजित पवार आणि सुनील तटकरे यांचे खूप मोठे योगदान असल्याचे यावेळी प्रास्ताविकात किसन जाधव यांनी मागणी केली. या मंदिर परिसर सुशोभीकरणामुळे मंदिराच्या सौंदर्यात मध्ये आणखीन भर पडणार आहे असेही किसन जाधव म्हणाले यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी केले. श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर हे अत्यंत प्राचीन कालीन असून या मंदिराला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्या पावन नगरीमध्ये रेवणसिद्धेश्वर मंदिरात सर्व धर्मीय भक्तांची दर्शनासाठी ओढ लागलेली असते या मंदिर परिसराच्या सुशोभीकरण कामासाठी किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून अजित पवार यांच्या माध्यमातून ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला. मंदिरात येणाऱ्या भक्तांना सोयी सुविधा मिळाव्यात या दृष्टीने या पुढील काळात या परिसराचा विकास किसन जाधव आणि मंदिर समितीच्या वतीनं नक्कीच होईल किसन जाधव यांच्या प्रयत्नातून ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला त्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि किसन जाधव यांचे आभार मानत धर्मराज काडादी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे म्हणाले की श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरात भक्तांच्या सोयी सुविधा साठी पालिकेच्या वतीनं जे सहकायार्ची अपेक्षा असेल ते तत्काळ पूर्ण करू मंदिराचे पावित्र राखण्यासाठी किसन जाधव यांच्या मागणीनुसार भक्तांना चांगल्या सोय सुविधा उपलब्ध करून देऊ सोलापूर शहर हे बहुभाषिक शहर आहे शहरांमध्ये काम करत असताना मला देखील बळ मिळेल नक्कीच विकासाच्या दृष्टीने सहकार्य करू अशी ग्वाही त्यांनी दिली. या मंदिर परिसर सुशोभीकरण शुभारंभ प्रसंगी या परिसरातील नागरिक आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी माने यांनी केले तर आभार आनंद मुस्तारे यांनी मानले.

## प्रबोधन

# अध्यात्माचा रोग

गायत्री मंत्र म्हणजे काय, असा प्रश्न एका भाविकाला विचारल्यावर त्याने हा मंत्र गायीचा आहे, असं अत्यंत भाविकपणे सांगून तिच्या शरीरात राहाणाऱ्या तेहतीस कोटी देवांना नमस्कार केला. त्या बिचाऱ्याला हा मंत्र सूर्य व त्याचा प्रकाश याविषयीचा आहे, हे सांगताच त्याने अहो आश्चर्यम अशी भावना व्यक्त केली. कित्येक संस्कृतिनिष्ठांनाही गायत्री मंत्राच्या अर्थाविषयी ओ की ठो माहीत नसतं. मात्र मंत्राची ही कॅसेट कंटाळवाणी असूनही लोक ते ऐकणं कल्याणकारक मानतात. त्यांचं कल्याण न कळण्याइतकं होतं की होत नाही ते न कळे! पण तेच तेच ऐकून त्यांना कंटाळा कसा येत नाही, असा प्रश्न मात्र आपल्याला निश्चित पडतो.

अध्यात्म हा असा दुर्बोध, दुःसाध्य, दुर्लभ, बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने दुःसह प्रकार आहे. अनावर बुद्धीच्या काही विचक्षण व्यक्तींना अध्यात्माच्या अंधाऱ्या गुहेत डोकावून पाहावं, अंधारात काही दिसतं का, याचा शोध घ्यावा असं वाटणं स्वाभाविक असलं, तरी अयोग्य असतं. पिकासोच्या चित्रासारखा, त्यातील अथार्सारखा हा प्रकार आहे. पु.ल. देशपांडे यांनी या चित्राथार्ची दांडी अपूर्वाईमध्ये छानपैकी उडवली आहे. पु.ल. लिहितात, 'तीच गत भिंतीवरच्या पिकासोची! एका खडबडीत दगडी भिंतीवर निरनिराळ्या रंगांची आणि आकृत्यांची आपसात दंगामस्ती चालली आहे. मी चांगला पाच मिनिटं त्या भित्तिचित्रापुढे उभा राहून तो गोंधळ समजावून घेण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी हे कार्य नव्हे तुजजोगे असं माझ्या मनाला सांगत तिथून निघालो.'

या बाबीला कलाक्षेत्रातील अध्यात्म असंच नाइलाजाने म्हणणं भाग पडतं. पिकासोच्या चित्रप्रदर्शनात अशा एका कलेच्या आध्यात्मिकाने पु.लं.ना पिकासोचा अर्थबोध होण्यासाठी एखाद्या दिवशी तुम्हाला ते गवसेल असा दिलासा दिला. असाच प्रकार सत्संग, भक्ती, तपश्चर्या याबाबतीत होतो. तो एखादा साक्षात्काराचा दिवस काही उजाडत नाही आणि त्यात सापडलेला भाविक काही गप्प बसत नाही. आशा सुटेना आणि देव भेटेना अशी त्याची गत होते. मग अध्यात्माच्या बाबतीत शहाण्याने काय करावं? त्याने पु.लं.चे मार्गदर्शक शब्द लक्षात ठेवावे. ते म्हणतात, 'शेवटी आयुष्य पुढे सरकताना काही दोर कापीत जावे लागते आणि त्या दिशेची वाट आपल्याला बंद आहे, हे ठरवावे लागते, हेच खरे! मी चित्रकलेचा दोर कापला आहे.'

पण माणसं पु.लं.च्या एवढी शहाणी नसतात. दोर हा बांधण्यासाठीच असतो आणि आपण दिसेल तो दोर जर बांधून घेत गेलो, तर आपलं सारं जीवन जखडलं जातं. अशा जखडलेल्याकडून काहीच नवं, स्वतंत्र, चांगलं घडत नाही, हे त्यांना कळत नाही. आपलं मन साऱ्या बंधनातून मुक्त ठेवणं, हेच माणसाचं ध्येय असलं पाहिजे. दिसेल ती दोरी बांधून घेणाऱ्याला शहाणपण कसं येणार?

संगणक क्षेत्रातील विकसित तंत्रज्ञानप्राप्त माणसंही जर गायत्री मंत्राचा महिमा जाणून घेण्याचा दोर आपल्या गळ्याला बांधून घेऊ लागली, तर राष्ट्राचा आणि ज्ञानाचा भविष्यकाळ फाशीवर जाईल, हे सहज कळायला काही हरकत नाही. अशा एका नामवंत संगणकतज्ज्ञाने काय म्हटलं आहे पाहा, 'विज्ञान काय किंवा अध्यात्म काय, सत्याचा शोध घेण्याचा दोन्हींचाही प्रयत्न असतो. त्यामुळे मानवी जीवनाला व्यापून उरणाऱ्या या दोन्ही विचारांचा एकाच वेळी अभ्यास करण्याने काहीच नुकसान होत नाही.' या परमसंगणक तज्ज्ञाला एक पंथ एक काज (एकावेळी एकच साधते) हे कळेल, तर बरं होईल, नाही तर आमच्या भाविष्यकालीन संगणकालाही ब्रह्म आणि माया यांच्या चर्चेतच मरावं लागेल. त्यांना एक साधै सब साधै; सब साधै सब जाय एवढं कळलं, तरी खूप झालं. जग आणि जीवन अध्यात्माने दुर्बोध होणं, हेच मोठं संकट आहे. कसं ते पाहा-

सुबोध असावे । जीवनात सारे
दुर्बोध ते सारे। दूर ठेवा ।।१
दुर्बोध अध्यात्म। मंत्र-तंत्र सारे
धूळफेकी वारे। वादळाचे ।।२
ब्रह्म-माया-आत्मा। तत्त्वज्ञान यांचे
मती कुंठण्याचे। फक्त काम ।।३
द्वैत-अद्वैताची। चर्चा घनघोर
वाया गेले थोर। चिंतनाने ।।४
जन्म आणि मृत्यू । हाच जीवनार्थ ।
चर्चा झाली मात्र। वारेमाप ।।५
सुबोध हे जग। सुबोध जीवन
आधी त्यांचे ज्ञान। प्राप्त करा ।।६
जग नि जीवन। यांच्या पलीकडे
गेले ते इकडे । येईनात ।।७
दुर्बोध तत्त्वांनी। जीवन नासले
दुधात पडले। जणू विष ।।८
जगणे सुबोध। करा प्रयत्नाने
नाश दुर्बोधाने। नको व्हाया ।।९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शिंदे सेनेचे शहर समन्वयक दिलीप कोल्हेंसह 11 पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे सोलापूर शहर समन्वयक तथा माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्यासह अकरा जणांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. पक्षाचे लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्यासह असंबंधित पदाधिकाऱ्यांचा मनमानी कारभार आणि वाढता हस्तक्षेप यामुळे पक्षाची वाताहत होत असल्याचा आरोप दिलीप कोल्हे यांनी पत्रकार परिषदेत केला.

या पत्रकार परिषदेत दिलीप कोल्हे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर शहर समन्वयक पद मला देण्यात आले. मात्र समन्वयक या नात्याने पक्ष वाढीसाठी वरिष्ठांकडून कोणतीही विचारणा झाली नाही. वरिष्ठांनी बैठक घेतली पाहिजे तसे झाले नाही. शहर समन्वयक असतानाही परस्पर बाहेरील काही पदाधिकारी इतर पदे नेमतात. असंबंधित लोकांचा वाढता हस्तक्षेप आणि मनपाणीपणामुळे पक्षाची वाताहत होत आहे. या सदर्भात मुंबईत वरिष्ठांची भेट घेऊन कैफियत मांडली आहे. संबंध नसतानाही बाहेरील लोक थेट पक्षाची पदे नेमणे योग्य नाही. वरिष्ठांच्या सूचनांची पायमल्ली होत आहे. महापालिका निवडणुकांच्या संदर्भात आवश्यक ती संघटनात्मक बांधणी आणि इतर नियोजन गरजेचे आहे. त्या संदर्भात चर्चा नाही. पक्षाच्या वरिष्ठांची दिशाभूल केली जात आहे, असा आरोप दिलीप कोल्हे यांनी केला आहे. पक्षातील असंबंधित हस्तक्षेप आणि बाहेरील लोकांचा मनमानीपणा यामुळे माज्यासह अकरा जणांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपले राजीनामे दिले आहेत. पक्षात एक शिवसैनिक म्हणून काम करणार आहोत. येत्या चार दिवसात बैठक घेऊन पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे, असेही दिलीप कोल्हे यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस राजीनामा दिलेले संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.

**या पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे**

शिवसेना शिंदे गटाचे शहर समन्वयक दिलीप कोल्हे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, सोशल मीडिया जिल्हाप्रमुख आशिष परदेशी, सोशल मीडिया शहर प्रमुख सागर शिंदे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख जवाहर जाजू, युवासेना उपशहर प्रमुख मयूर झांबरे, शिवसैनिक नवनाथ भजनावळे, राहुल काटे यांच्यासह अकरा पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत, असे दिलीप कोल्हे यांनी सांगितले.

# डॉ.कमलादेवी आवटे यांचा सहसंचालकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल सत्कार



**माढा (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या माजी प्राचार्या तथा महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ येथे प्राचार्य पदावर कार्यरत डॉ. कमलादेवी श्रीधर आवटे यांना पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत सहसंचालकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा माढा तालुकावासीय यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे माढा तालुका उपाध्यक्ष तानाजी देशमुख यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी सांगितले की, मला सहसंचालकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल जो माढा तालुकावासीय यांच्या वतीने माझ्या कार्यालयात येऊन सत्कार करण्यात आला त्याचा मला मनस्वी आनंद झाला आहे.या पदाच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रश्न व समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहे.ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन दरबारी वरिष्ठांकडे प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले आहे. यावेळी माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष तानाजी देशमुख, विठ्ठलवाडीचे सहाय्यक आयुक्त प्रशांत उबाळे, आकाश खैरे, धानोरे देवीचे सुरज देशमुख, माढ्याचे रोहन जुगदार, सहदेव खैरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## वात्रटिका

### आपण एक असावे

पटक पटक मारणाऱ्याचे
लटपटीने स्वागत आहे...
कोणीही यावे स्वागत आहे
हे तसे तर त्यांचे स्वगत आहे...
सौख्यभरे सारे असावेत
ही तर आमची इच्छा आहे...
भाषेला प्रांतवादाकडे न नेता
सुखाने नांदावे ही सदिच्छा आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सनराइज गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थी पदग्रहण समारंभ उत्साहात



**टेंभुर्णी, (कटूसत्य वृत्त):-** – येथील सनराइज गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या पदग्रहण समारंभाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात निवडक विद्यार्थ्यांना 'हेड बॉय' (Head boy), 'हेड गर्ल' (Head girl), 'हाऊस मास्टर' (House master) आणि 'हाऊस लीडर' (House leader) यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर नियुक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष योगेश बाबाराजे बोबडे, संस्थेच्या सचिव सुरजाताई बोबडे, अकॅडेमिक डायरेक्टर शाहिदा पठाण मॅडम आणि प्रशालेचे प्रिन्सिपल प्रभाकर सर उपस्थित होते. याचबरोबर पालक शिक्षक समितीचे सदस्य प्रिया शहा मॅडम तसेच गोवर्धन नेवसे सर हेही आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर, हेड बॉय आणि हेड गर्ल यांच्यासह सर्व हाऊस लीडर्सची निवड जाहीर करण्यात आली. संस्थेच्या सचिव सुरजाताई बोबडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना त्यांच्या नवीन जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली आणि पदाचे महत्त्व समजावून सांगितले.

अकॅडमिक डायरेक्टर शाहिदा पठाण मॅडम यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांचा शपथविधी पार पाडत विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्त्व सांगितले आणि त्यांच्या कार्याची दिशा स्पष्ट केली.

प्रिन्सिपल प्रभाकर सरांनी सर्व नवनियुक्त विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कर्तव्याची शपथ (Oath) घेतली, ज्यामुळे त्यांच्यामध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन प्रशालेचे क्रीडा शिक्षक राहुल काळे सर, अनिकेत सर आणि कलाशिक्षक सतीश साळुंखे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली अनंतवार मिस यांनी केले, तर शक्ती सोनवणे सरांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विविध मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र वडार समाजाचा वतीने रॅली काढून निवेदन

## टेंभूर्णी येथील वडार संघटनेचे नेते राजकुमार धोत्रे यांचा नेत्रृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** अखिल महाराष्ट्राचा वडार समाजाचा वतीने पोलीस ठाण्याचा समोर रॅली काढून आंदोलन करण्यात आले. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून रॅली सुरुवात करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळ्यास अभिवादन करून टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर मोचेकरी बसून मागण्यांचे निवेदन दिले. वडार समाजाचा एसटी प्रवरगमध्ये समाविष्ट करावा, वडार समाजाला अट्रॉसिटी कायद्यानुसार संरक्षण मिळावे, आर्थिक विकास महामंडळं स्थापन करावे, मुलांसाठी जिल्हास्तरावर शासकीय वस्तीग्रह निर्माण करावे, महिलंसाठी व मुलींसाठी सब्लिकरणाचा धोरणांचा लाभ मिळावा, जातींचे दाखले व नॉन क्रिमिल्यार दाखले कॅम्प घेऊन करावे



आदी मागण्या करण्यात आल्या. या वेळी वडार समाजाचे नेते राजकुमार बाबा धोत्रे यांचा नेत्रात्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी अनिल पवार, गणेश देवकर, सागर पवार, रमेश पवार, घोडगे मामा, रामभाऊ वाघमारे, महेंद्र सोनावणे, श्रीकांत मासुळे, प्रकाश ननवरे, समाधान पवार, भरत दळवी, तानाजी पवार, रामभाऊ बनपट्टे, विकास बंदपट्टे, गणेश धोत्रे, महावीर वाजाळे, सुनील ओव्हाळ, कालिदास पवार, सनी पवार, बाळू जाधव, अनिल आरडे, शंभू पवार, शिवाजी पवार, मानेगाव पिंटू चौगुले, माढा, करमाळा व पंढरपूर तालुक्यातील वडार समाजातील कार्यकर्ते आदी उपस्थित होते. यावेळी मागण्यांचे निवेदन मंडल अधिकारी सुजित शेळवणे यांनी स्वीकारले. यावेळी पोलिसांनी बंदोबस्त चोख ठेवला होता.

# डॉ. सोहेल शेख यांना मानद पीएच.डी. पदवीने सन्मानित



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** साहित्य आणि सामाजिक कार्यात आपल्या उल्लेखनीय योगदानासाठी डॉ. सोहेल शेख यांना ‘वर्ल्ड ह्युमन राईट्स प्रोटेक्शन कमिशन, अमेरिका’ तसेच ‘ऑनररी डॉक्टरेट अवॉर्ड कौन्सिल’ यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी मानद 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.)' या पदवीने सन्मानित करण्यात आले.

डॉ. शेख यांचे सामाजिक भान, मानवाधिकार क्षेत्रातील कार्य, तसेच साहित्य लेखनातील समर्पित योगदान याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे समाजात जागरूकता निर्माण झाली असून, नव्या पिढीसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

हा सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता असून, या माध्यमातून त्यांचे कार्य अधिक व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होईल.

या गौरवाबद्दल डॉ. सोहेल शेख यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, विविध सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# नेताजी महाविद्यालयात अकरावी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत नव्याने प्रवेश घेतलेल्या १६९ विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रविशंकर कुंभार होते. प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, नेताजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



प्रथम श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व श्री तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राजराजेश्वरी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. प्रा. अंगद तोरणे यांनी प्रास्ताविकेत महाविद्यालयातील नियम, अभ्यासक्रम, विविध उपक्रम या विषयी माहिती सांगितले. यावेळी प्रमुख अतिथी विजयकुमार हुल्ले म्हणाले, दहावीनंतर महाविद्यालयातून विद्यार्थ्यांच्या ख-या करिअरच्या स्वप्नाला सुरुवात होत असते.दोन वर्षे जिद्दीने, चिकाटीने अभ्यास करुन चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतरच आई -वडिलांचे स्वप्न साकार होईल म्हणून प्रत्येकानी परिस्थितीची जाणीव ठेवून आई -वडिलांचे नाव लौकिक करावी. प्राचार्य कुंभार म्हणाले, महाविद्यालयातील दोन वर्षे अतिशय महत्त्वाची आहेत. अनुभवी प्राध्यापकांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेऊन स्वतःला घडविण्यासाठी प्रयत्न करावे.प्रामाणिकपणे मेहनत केल्यास उज्वल भवितव्य साकार होईल असे प्रतिपादन केले.या स्वागत समारंभास कला शाखेतील ५८, वाणिज्य शाखेतील ६०, विज्ञान शाखेतील ५१ विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी प्रा.चंद्रशेखर पाटील, प्रा.राजश्री स्वामी, प्रा. शांतेश करजगी, प्रा.अमरनाथ दुस्सा, प्रा.दीपक नरोणे,प्रा.महेश नराल, प्रा.पी.सी.अंबारे, प्रा.गीता चव्हाण, प्रा.विद्या चिकाळ्ळे, प्रा.प्रज्ञा धुमशेट्टी आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट नगर परिषद
## जि.सोलापूर

दूरध्वनी : 02181-220253 | ई-मेल आयडी - comcakkalkot123@gmail.com

जा.क्र./अनप/कावि/विवि/२०२५/७१४ | दि. ०४/०८/२०२५

### निविदा सूचना

अक्कलकोट नगर परिषद न. प. निधी व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून/निविदाधारकाकडून निविदा मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून दि. ०५/०८/२०२५ पासून ते दि. १२/०८/२०२५ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालीलप्रमाणे निश्चित किमत जमा केल्यानंतर न. प. कार्यालयात विद्युत विभागाकडे विकत मिळतील.

१) कंत्राटदाराने मोहरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी नगर परिषद अक्कलकोट यांच्याकडे दिनांक १२/०८/२०२५ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदासोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) जमा केलेल्या बयाना रकमेचा पावती क्रमांक सीलबंद लिफाफ्यावर नमूद करावा ४) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ०६.०० वाजता मा. मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्या दालनात समक्ष उघडण्यात येतील. ५) पात्र निविदा धारकाच्या बिलातून अनामत रक्कम, आयकर,GST, कामगार उपकर इ. बाबींची रक्कम नियमानुसार कपात करण्यात येईल. ६) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून विद्युत विभागात पहावयास मिळतील. ७) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न. प. ने राखून ठेवला आहे. ८) निधी उपलब्धतेनुसार कामाचे देयक प्रदान करण्यात येईल याची नोंद घेऊन निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म रक्कम फीस | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे इलेक्ट्रीकल फिटींग करणे. | ८८,६६५/- | १७८०/- | ७,१००/- | ५९०/- | ४५ दिवस |

**सही/-**
**डी. एस. शेळके**
**विद्युत अभियंता**
**अक्कलकोट नगर परिषद**

**सही/-**
**आर. डी. डाके**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**अक्कलकोट नगर परिषद**

# अकलूजमध्ये आपदा मित्र/सखींसाठी शोध व बचाव प्रशिक्षण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत रायगड येथे आपदा मित्र/सखी प्रशिक्षण पूर्ण करून परतलेल्या स्वयंसेवकांसोबत अकलूज नगरपरिषद कर्मचारी यांचा संयुक्त शोध व बचाव कायार्चा सराव अभ्यास शनिवार, दि. २ ऑगस्ट व



रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. हे प्रशिक्षण अकलूज नगरपालिका मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या सहकार्याने, तर निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या निर्देशानुसार घेण्यात आले, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली. सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत आयोजित या उपक्रमात आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि सोलापूर रेस्क्यू स्क्वाडचे प्रशिक्षित स्वयसेवक अनिल सल्ले यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये जलप्रलय, इमारत कोसळणे, आग लागणे अशा विविध आपत्ती परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याच्या तंत्रांचा सराव करण्यात आला. आपदा मित्र/सखी आणि नगरपरिषद कर्मचारी यांना प्राथमिक उपचार, शोध व बचाव उपकरणांचा वापर, सुरक्षिततेची काळजी, तसेच समन्वयात्मक कार्यपद्धती याचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे अकलूज शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होणार असून, भविष्यातील संकटांना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

सदर प्रशिक्षणामुळे आपदा मित्र/सखींचा आत्मविश्वास वाढला असून, त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडण्याची तयारी दर्शवली आहे, असे श्री. ढोले यांनी सांगितले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण




**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेलः- comcpandharpur@gmail.com

जा.क्रं./पंनपं/आरोग्य/४१६८/२०२५ | दि.०४/०८/२०२५

### आरोग्य विभाग
### तृतीय फेर वार्षीक निविदा सन २०२५/२६

| अ. क्र. | नांव | अंदाजे परिमाण | एकुण किमंत | बयाना रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | न.पा. कडील कचरा वाहने व इतर वाहनांची सर्व प्रकरची दुरुस्तीची कामे मजुरीसह नविन स्पेअरपार्ट टाकुन करणे. | आवश्यकतेनुसार | २,५०,००० | ३००० | ३०० |

शर्ती व अटी

१ नविदांचे कोरे फॉर्म नगर परिषदेच्या अभिलेखा कक्षात दि. ०५/०८/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ अखेर दुपारी २.०० पर्यत उपलब्ध होतील.

२ निविदा स्विकारण्याची तारीख दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत राहिल. सदर निविदा बारनिशी विभागाकडे सादर करणेची आहे.

३ स्वतंत्र कामाच्या स्वतंत्र निविदा भरणे आवश्यक आहे. बयाना रक्कम डिडिने दि.११/०८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येईल.

४ निविदा दोन लिफाफा पध्दतीने भरणेची आहे. लिफाफा क्र.१ हा दि. १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा व लिफाफा क्र.२ हा दि. १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. उघडण्यात येतील.

५ सर्व प्रकारची जड वाहने दुरूस्ती करणे कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६ निविदा संबंधी अधिक माहिती आरोग्य विभागामध्ये पाहावयास मिळेल

७ इतर अटी व शर्ती निविदाफॉर्ममध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

८ कंत्राटी कामा बाबत शासन निर्णय अंमल बजावणी जबाबदारी संबमधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील. (किमान वेतन कायदा, कामगार विमा,PF नंबर असणे आवश्यक, कामगार सुरक्षा साधणे इ.)

**सही/-**
**(श्री. शरद वाघमारे)**
**आरोग्याधिकारी**
**नगरपरिषद पंढरपूर**

**सही/-**
**(श्री. महेश रोकडे)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

# पंढरपूरात महसूल सप्ताहाचा शुभारंभ

## उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** तहसिल कार्यालय पंढरपूर येथे आज महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. पंढरपूर तालुक्यातील महसूल कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचा वर्षभरातील कामगिरी बाबत उत्कृष्ट पुरस्कार देण्यात आले. तसेच तालुक्यातील लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

यावेळी नायब तहसिलदार व्ही.व्ही. बुचके, उत्कृष्ट मंडळ अधिकारी आर.बी. वाघमारे, उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी डी. के. गावदरे, उत्कृष्ट ग्राम महसूल अधिकारी आर.बी. लोखंडे, उत्कृष्ट महसूल सहायक विजय झोरे, उत्कृष्ट शिपाई बी.एम. शिंदे, उत्कृष्ट महसूल सेवक, शिवा सलगर, उत्कृष्ट पोलीस पाटील, बालाजी माने यांना उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांना तहसिल कार्यालय या ठिकाणी बोलावून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडण्याबाबतची कार्यवाही करणेचे निर्देश यावेळी देण्यात आले.

तसेच पंढरपूर तालूक्यातील तहसिलदार व नगर भूमापन अधिकारी अशा प्रकरणांवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 155 खालील प्रकरणांबाबत निर्णय घेऊन एकूण 22 आदेश पारित करून 7/12 दुरूस्ती करून संबंधित खातेदार यांना वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शासनाने तयार केलेले ई-हक्क पोर्टलवर सेतु सुविधा केंद्रामार्फत नोंदवून त्यानंतर तहसिलदारांकडे पाठविण्यात यावीत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.




### तहसिलदार सचिन लंगुटे यांचा उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मान

राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम राबविल्याबद्दल पुणे विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी पंढरपूरचे तहसिलदार सचिन लंगुटे यांचा विभागीय स्तरावर उत्कृष्ट तहसिलदार म्हणून विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते सन्मान करणेत आला. तसेच सोलापूर जिल्यातील उत्कृष्ट खो खो खेळाडू म्हणून श्री. पंकज राठोड मंडळ अधिकारी कासेगाव तालुका पंढरपूर राष्ट्रीय व अनेक राज्य स्तरीय खो खो स्पर्धामध्ये विशेष प्राविण्य मिळवल्या बदल सन्मान यावेळी करण्यात आला.

# योजनांचा लाभ सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल प्रशासनाने काटेकोरपणे प्रयत्न करावेत - सीईओ जंगम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महसूल विभागाच्या विविध सेवा व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा लाभ नागरिकांना मिळावा, यासाठी 1 ते 7 ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

तरी महसूल विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शासनाच्या योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचतील यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी असे आव्हान प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'महसूल सप्ताह 2025' चा भव्य शुभारंभ आज श्री शिवछत्रपती रंगभवन येथे झाला. प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास पोलीस आयुक्त एम. राजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी निवडणूक गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी सुमित शिंदे, उपविभागीय प्रांताधिकारी सचिन इथापे, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, अकलूज प्रांताधिकारी विजया पांगारकर, कुडुर्वाडी प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार निलेश पाटील, संजय भोसले, मदन जाधव, श्रीकांत पाटील, शिल्पा पाटील, शिल्पा ओसवाल यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जनजागृती आणि विश्वासवृद्धीसाठी विशेष मोहिम

प्रभारी जिल्हाधिकारी जंगम यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले की, 'महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शासनाच्या कामकाजाबाबत विश्वास वाढवणे आणि योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा महसूल सप्ताह साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश आहे.'

### सप्ताहभर उपक्रमांची मालिका

महसूल सप्ताहात जिल्ह्यात विविध जनजागृती मोहिमा, योजनांचे लाभ वितरण, माहिती सत्रे, कार्यशाळा आणि नागरिक संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत पारदर्शकता आणि जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी प्रस्तावना सादर केली, तर अमित माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### महसूल कर्मचाऱ्यांचा गौरव

महसूल दिनानिमित्त 2024-25 मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 56 अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय कार्यरत कर्मचाऱ्यांच्या 10वी व 12वीच्या गुणवंत पाल्यांचा देखील गौरव करण्यात आला. जंगम यांनी महसूल कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या कायाची प्रशंसा केली.

### पोलीस आयुक्तांचे विशेष मनोगत

पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी महसूल कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, 'शासनाचे कोणतेही महत्त्वाचे काम असो, त्याची जबाबदारी सर्वप्रथम महसूल विभागावरच असते. त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच प्रशासन सुरळीत चालते.'

# सार्वजनिक ग्रंथालयांनी अद्ययावत रहावे : हुसे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. ग्रंथालयांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी सतत अद्ययावत राहिले पाहिजे. त्यातून अधिक चांगल्या सेवा, सुविधा देत वाचकांभिमुख होता येईल, असे प्रतिपादन सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले.

सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील 'स्वेरी' अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस आणि सांगोला या चार तालुक्यांमधील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. इमारत बांधकाम, महिला व बाल विभाग तसेच ग्रंथालय विकासाच्या इतर बाबींची माहिती देऊन त्यासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती हुसे यांनी दिली. यावेळी जिल्हा ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे यांनी 'आरआरएलएफ' नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या सर्व बाबींची प्रोजेक्टरद्वारे प्रत्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली. तांत्रिक सहाय्यक प्रमोद पाटील यांनी 'ग्रंथ संजीवनी' व 'एनजीओ दर्पण' या योजनांची माहिती देत उपयुक्तता विषद केली.



या कार्यशाळेसाठी जिल्हा ग्रंथालय संघाचे मार्गदर्शक कुंडलिक मोरे, अध्यक्ष विजयकुमार पवार, सचिव साहेबराव शिंदे, सहसचिव अन्सर शेख, ज्योतीराम गायकवाड, कल्याणराव शिंदे यांनी मार्गदर्शन केले. 'स्वेरी'चे डिन प्रा.डॉ. करण पाटील यांनी ग्रंथालय चळवळीचे समाजासाठीचे योगदान खूप मोलाचे असल्याचे नमुद केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी संचालक मच्छिंद्र लेंडवे, प्रवीण पाठक, मिलींद उत्पात, प्रशांत जाधव, हनुमंत शिंदे, प्रमोद गायकवाड, तानाजी जाधव, दिलीप भोसले, संजय सरगर, माऊली कुलकर्णी, विनायक गुरव, संजय चव्हाण आदीनी परिश्रम घेतले. यावेळी पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, सांगोला या चारही तालुक्यांमधील ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथालय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सहसचिव अन्सार शेख यांनी केले. सूत्रसंचालन रामदास नागटिळक यांनी केले, तर आभार सुनील नागणे यांनी मानले.

# वाशिंबेतील केळी पुरवठादाराची ४० लाख ६७ हजाराची फसवणूक

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** विश्वास संपादन करून लाखो रुपयांची वेळी खरेदी केली मात्र पुन्हा पैसेच न देता विश्वासघात केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामध्ये वाशिंबे येथील केळी सफलाब- सची ४० लाख ६७ हजार २०२ रुपयाची फसवणूक झाली आहे.

याप्रकरणात धनराज ज्ञानदेव भोईटे (वय ४४, रा. वाशिंत्रे) यांच्या फिर्यादीवरून टेंभुर्णीतील केळी एक्स्पोर्ट कंपनीचे मालक अजिंक्य मधुकर देशमुख यांच्याविरुद्ध करमाळा पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. फिर्यादीनुसार वाशिंबेतील भोईटे यांची केळी सप्लाय करणारी कंपनी आहे. कंपनीमार्फत ते आजूबाजूच्या शेतकऱ्यांची केळी घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी देतात.२०२४ मध्ये त्यांनी गुन्हा दाखल झालेल्या संशयित देशमुख यांच्या कंपनीसोबत केळी सप्लाय करण्याचा व्यवसाय सुरू केला होता. देशमुखला त्यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये मा२४ लाख ३ हजार १५१ रुपयाची केळी दिली होती.त्यांनी १५ ते २० दिवसांमध्ये पैसे देणे आवश्यक होते. परंतु केळी पुरवल्यानंतर बरेच दिवस पैसे न दिल्याने त्यांना वारंवार फोन करून केळी पुरवलेल्या पैशाची मागणी केली. मात्र त्यांनी फक्त ५ लाख ८४ हजार ९९८ रुपये दिले आहेत. त्यां ज्याकडे १८ लाख १८ हजार १५३ रुपये येणे बाकी आहे.मतोन नबीलाल शेख यांनीही देशमुखकडे २४ लाख ७५ हजार ११७ रुपयेची केळी दिली.त्यापैकी त्याने २ लाख ६९ हजार रुपये दिले. उर्वरित २२ लाख ४९ हजार देण्यास नकार दिला आहे,असे फिर्यादीत म्हटले आहे.त्यावरून संबंधित कंपनीच्या मालकाने विश्वास संपादन करून केळी घेऊन पैसे न देता फसवणूक केली असल्याची फिर्याद दिली आहे. याचा पुढील तपास करमाळा पोलिस करत आहेत.

## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) विभाग, सोलापूर यांचे कार्यालय**
**९१६,सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर-४१३००३**

जावक.क्र.का.अ./सोविवि/निलि/१४५६/२०२५
दिनांक-: २३/०७/२०२५

दूरध्वनी क्रमांक-: (०२१७) २३१२८९४
Email ID - elsolapur.ee@gmail.com
elsolapur.ee@mahapwd.gov.in

### निविदा सुचना क्र. ०८/२०२५-२६

कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर महाराष्ट्र शासनाकडील अनुज्ञाप्तीधारक, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागास नोंदणीकृत व अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून B-1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahapwd.com वरील Pay PWD Online या पोर्टलवरुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा व अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
(कामाचे नाव : निविदेत एकूण ०७ कामे आहेत.)

| Sr.No | Estimate No & Name of work | Tender Amount | Class of Contractor |
|---|---|---|---|
| 1 | Est no. 1310210 of 2025-2026 - Providing replacement of old 100KVA transformer by new 250 KVA Transformer at Old Govt. Medical College Solapur, Dist: Solapur | 821359.00 | Bidders Should have valid Electrical Contractor License issued. by I.E.& L Dept. Govt. of Maharashtra and Registered Electrical Contractor Class D or above issued by Public works (Electrical) Department, Government of Maharashtra. |
| 2 | Est no. 231044 of 25-26 Providing Monthly Fully Comprehensive maintenancé contract of (2 Nos.) 15 passenger capacity of Marconi make Lift at Dr.V.M.Medical College, Solapur Dist: Solapur (for 3 years) | 509976.00 | |
| 3 | Est no. 1310218 of 2025-2026 - Providing replacement of faulty main underground cable of Administrative building at Dr. V.M. Medical College Solapur, District - Solapur | 474680.00 | |
| 4 | Est no. 134309 of 2025-2026 - Providing Shifting of LT Line in r/o Dy. Engineer PWD (Electrical) Sub division Akluj. At Angar, Tal - Mohol Dist - Solapur. under 1.3% DDF Scheme | 608435.00 | |
| 5 | Est no. 135231 of 2025 2026 - Providing Shifting of LT OH Line to LT UG Cable At Government Rest House (PWD) Out House to Division Office Compound at Link Road Pandharpur, Taluka-Pandharpur, District - Solapur (Under 1.3% DDF Scheme) | 556838.00 | |
| 6 | Est no. 2310217 of 25-26 Providing special repairs of Ceiling Fan and Led Tube Light at B Block of Shree CSM General Hospital Solapur, Dist Solapur | 421580.00 | |
| 7 | Est no. 2310212 of 25-26 Providing repairs to El and switchgear at C block medical store, Nurses quarters (2 Nos) near A Block, PICU, Gynic OT, HIV Seminar Hall, NICU meter room of Shree CSM General Hospital Solapur, Dist Solapur | 407149.00 | |

१. निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०५/०८/२०२५ ते दिनांक १२/०८/२०२५
२. निविदा पुर्व बैठक व स्थळ : निरंक
३. निविदा उघडणे : दिनांक १४/०८/२०२५ रोजी कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर-४१३००३.
४. खालील संकेतस्थळावर ई- निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.(www.mahapwd.com)

**सही/-**
**(श्री.सु.गुजरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम सोलापूर, विद्युत विभाग,सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/८२/२०२५-२६

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ५९०/२०२३

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

१) शमीनबानु अ. हमीद कोल्लूर, वय- ५७ वर्षे, धंदा घरकाम,
२) ईरफान अब्दुल हमीद कोल्लूर,वय: ३५ वर्षे, धंदा : व्यापार, दोघे रा. आडकी फॉवरमिल जवळ, प्लॉट नं. १३५/१२८, महादेवी नगर, नई जिंदगी चौक, सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे पिता मयत अब्दुल हमीद मुलकासाब कोल्लूर हे दि.३१/०७/२००८ रोजी मयत झाले आहे. त्यांचे नावे डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापुर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका शहर हद्दवाढीतील मजरेवाडी भागातील निवासी व्यवस्थेची मिळकत क्र. ६७२१२२ मधील महादेवी नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील सर्व्हे नं. २२७ यापैकी प्लॉट नं. १२५ ते १२८ यांसी क्षेत्रफळ पूर्व-पश्चिम ४५ चौ. फुट व दक्षिणोत्तर ३० चौ. फुट असे एकूण क्षेत्र १३५० चौ. फुट, अशी मिळकत असून मयताच्या पश्चात अर्जदार नं. १ व २ यांचे नांवाची नोंद मिळकत दप्तरी नोंद होणेकरिता अर्जदार नं. १ व २ यांनी वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि.१२/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि ५/८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/- क.लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक सि.ज. ज्यु.डी. सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ६३०/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायधिश वरिष्ठ स्तर श्रीमती.ए.एस.जाधव सो,यांचे कोर्टात**

१) श्री. महेश विष्णू पन्हाळकर,वय:५३ वर्षे, धंदा:नोकरी,रा.९४/१/ब/२/२/ब/१,प्लॉट नं.३, राजदिप नगर,बॉम्बे पार्क जवळ, सोलापूर
२) शत्रुघ्न विष्णू पन्हाळकर,वय:५१ वर्षे,धंदा:नोकरी, रा. ३०९, उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर
३) परशुराम विष्णू पन्हाळकर,वय:५० वर्षे, धंदा: नोकरी,रा.साहिल पुरम रो हाऊस नं. २,प्लॉट नं. ४, दत्त मंदिर जवळ, राजेशिवाजीनगर, चिंचवड, पुणे
४) पुजा राजू कलाल,वय:४८ महिने,धंदा:घरकाम रा. बालामल चाळ, प्लॉट नं.२३, डिलक्स रोड, वर्धमान ज्वेलर्स समोर, पिंपरी, पुणे } अर्जदार

**विरूध्द**

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांची आई कै.लक्ष्मी विष्णू पन्हाळकर हे दि. ०७/०४/२०२५ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. त्यांचे नावे डि व सब डी सोलापूर पैकी, ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापुर महानगरपालिका नवीन हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील जुळे सोलापूर भाग-१ येथील जुना सर्व्हे नं. ३१२ पैकी नवीन सर्व्हे नंबर १३० पैकी पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळ पुणे म्हाडा योजनेतील गोकुळ नगर मधील ९७ अल्प उत्पन्न गटातील गाळा क्र. क-७९ याचे एकूण क्षेत्र ५० चौ.मी. व वाढीव ४०.७० चौ.मी. असे एकुण क्षेत्र ९०.७० चौ.मी. इतकी असून, यांत २१.७० चौ.मी. लोडबेअरिंगचे बांधकाम आहे. याची चतु:सीमा : पुर्वेस - ९.१४ मी. रस्ता, दक्षिणेस-गाळा क्र.८०, पश्चिमेस, गाळा क्र. ७८, उत्तरेस- ५.० मीटर रस्ता अशी असून अर्जदार यांचे नांवाची नोंद मिळकत दप्तरी नोंद होणेकरिता अर्जदार हे मयताचे मृत्युपश्चात वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि.४/९/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी. आज दि. ५/८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक सि.ज. ज्यु.डी. सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ६३७/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर एम.पी.मर्ढेकर सो, सोलापूर यांचे न्यायालयात**

१)शहनाज हुमायू सगरी,वय:६४ वर्षे,धंदा:-घरकाम,
२) महिबुब हुमायु सगरी,वय:-४३ वर्षे,धंदा:-मजुरी, दोघे रा. प्लॉट नं.४८, महात्मा फुले नगर, अमन चौक, सोलापुर } अर्जदार
३) मसूद हुमायू सगरी,वय:-३८ वर्षे,धंदा:-व्यापार, रा. प्लॉट नं.४८, महात्मा फुले नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापुर

**विरूध्द**

कोणी नाही } सामनेवाला

१अ) मिळकतीचे वर्णन:-डिव सब डिसोलापूर पैकी शहर सोलापूर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना स.नं. २८२/२ब यापैकी महात्मा फुले नगर या नावाने ओळखले जाणारे नगरमधील प्लॉट नंबर ६१ असे असून यांसी हद्द पूर्वपश्चिम २८.५ फुट, दक्षिणोत्तर ३३ फुट असे एकूण क्षेत्र ९४०.५ चौ. फुट किंवा ८७.४० इतके आहे. सदर घरजागेत चार रुम संडास बाथरुम, लाईट व नळ कनेक्शनसह असलेली घरजागा असुन उर्वरित जागा ही खुली असुन त्याचा सो.म.पा. सोलापुर येथील मिळकत क्रं. ६४०४४४ यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे- पुर्वेस :- प्लॉट नं.६२, पश्चिमेस :- प्लॉट नं. ६०, दक्षिणेस:- प्लॉट नं.५८, उत्तरेस:-रस्ता

१ब) मिळकतीचे वर्णन:- डि व सब डि सोलापूर पैकी शहर सोलापूर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना स.नं.२८२/२ब यापैकी महात्मा फुले नगर या नावाने ओळखले जाणारे नगरमधील प्लॉट नंबर ४८ असे असून यांसी हद्द पूर्वपश्चिम ३२ फुट, दक्षिणोत्तर ३३ फुट असे एकूण क्षेत्र १०५६ चौ. फुट इतके आहे. सदर घरजागेत चार रुम संडास बाथरुम, लाईट व नळ कनेक्शनसह असलेली घरजागा असुन उर्वरित जागा ही खुली असुन त्याचा सो.म.पा. सोलापुर येथील मिळकत क्रं. ६४०४१२ यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे- पुर्वेस : - प्लॉट नं. ४७, पश्चिमेस:- रस्ता, दक्षिणेस:- शेख यांची घरजागा, उत्तरेस :- रस्ता, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमूद अर्ज कलम १अ व १ब मध्ये वर्णन केलेल्या घरजागा ही हुमायु महेबूब सगरी यांच्या मालकी वहिवाटीची आहे. यातील हुमायु महेबूब सगरी हे दिनांक २२/११/२०२३ रोजी सोलापुर येथे मयत झालेले आहे. अर्जदार नं.१ ही मयत पै. हुमायु महेबूब सगरी यांची पत्नी असून अर्जदार नं. २ व ३ हे पै. हुमायु महेबूब सगरी यांचे मुले आहेत. अर्जदार नं.१ ते ३ यांच्याशिवाय कोणतेही कायदेशीर वारसदार नाही. सदर वर कलम १अ व १ब मधील नमूद मिळकत ही पै. हुमायु महेबूब सगरी यांची मालकी वहिवाटीची असून त्यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार नं. १ ते ३ हे मयत हुमायु महेबूब सगरी यांच्या वर नमुद मिळकतीमध्ये वारसदार या नात्याने हक्क प्राप्त होतो.

यातील अर्जदार नं.१ ते ३ यांनी पै. हुमायु महेबूब सगरी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारसा दाखला (Heirship Certificate) मिळणेसाठी या मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी पै. हुमायु महेबूब सगरी यांना कोणी कायदेशीर वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अथवा पुढील नेमलेली तारीख १६/०९/२०२५ रोजी स्वत: अथवा प्रतिनिधीमार्फत हजर होवून आपली लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीहि कसलीहि हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदार नं.१ ते ३ यांचे नांवे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्याचे पुढील हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस आमच्या सही व कोर्टाचे शिक्यानिशी आज दिनांक ०५ माहे ८ इसवी सन २०२५ रोजी प्रसिध्द केली असे.

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ६४१/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन श्रीमती.ए.एस.जाधव सो,यांचे न्यायालयात**

१) श्री. रमेश पिता मल्हारी जिंदे, वय- ५० वर्षे, धंदा-नोकरी,
२) सौ. विजयालक्ष्मी पती दिलीप उपरे(लग्नानंतरचे नाव) विजयालक्ष्मी पिता मल्हारी जिंदे (लग्नापुर्वीचे नाव) वय - ६१ वर्षे, धंदा- घरकाम,
३) सौ. राधा पती नरेंद्र शिंगाडे (लग्नानंतरचे नाव) राधा पिता मल्हारी जिंदे (लग्नापुर्वीचे नाव) वय - ४४ वर्षे, धंदा- घरकाम,
सर्वजण रा.२९९२,जे-१ ग्रुप,जुना विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

कोणी नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांची जनक आई अंबुबाई मल्हारी जिंदे यांचे दि.२२/०८/२०२१ रोजी निधन झालेले आहे. तसेच यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे जनक वडिल मल्हारी गुंडप्पा जिंदे यांचे दि.०९/१०/२००८ रोजी निधन झालेले आहे..मयताच्या पश्चात अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारसदार होते व आहेत. तसेच मयत अंबुबाई मल्हारी जिंदे यांचे नांवे डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापुर पैकीसोलापुर महानगरपालिका हध्दवाढ मधील विडी घरकुल येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचे मार्फत जुळे सोलापूर भाग-२ या योजनेतील विडी कामगाराचे अल्प उत्पन्न गटातील जा.क्र./का.अ./मि.व्य./१७०/१९८९/जे-१ दि. २७/१२/१९८९ रोजीचे सोडत क्र. ८३८, अर्ज क्र. ८०६ आदेशाप्रमाणे जे-१ ग्रुपमधील गाळा नं. २९९२ याचे एकूण क्षेत्र ५५० चौ. फुट इतकी असून यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे :- पूर्वेस :- गाळा नं. २९९१, पश्चिमेस :- ३ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :-गाळा नं. २९९३, उत्तरेस :- गाळा नं. २९७८ येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत.

सदर मिळकतीवर वारसदार सदरी अर्जदार नं. १ ते ३ यांचे नांवे नोंद होणेकरीता अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) साठी मे. कोर्टात अर्ज केलेले आहे.

त्याअर्थी जर कोणास अर्जदार यांचे नांवाने वारस प्रमाणपत्र घेण्यासंबंधी काही म्हणणे हरकत असल्यास यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा नेमलेली ता.०४/०९/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नांवाने वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही काहीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीरनामा/जाहीर प्रसिध्दीकरण सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे. ही जाहीरनामा/जाहीर प्रसिध्दीकरण दिली. दि.५/८/२०२५

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर सोलापूर

## राजकीय पक्ष नोंदणी बाबत जाहीर सूचना

मी अर्जदार श्री. मनिष सुभाष गायकवाड. या जाहीर सूचने द्वारे असे घोषित करतो की, "जनहित सेवा पक्ष" या नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्याकडे आम्ही अर्ज केला आहे. या पक्षाचे मुख्य कार्यालय लिमयेवाडी ९६४/६५ ए एरिया सोलापूर. पिन कोड ४१३००१ या ठिकाणी असेल,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनीयमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप) आदेश २०२५ या आदेशानुसार पक्षाच्या नोंदणीसाठी अर्ज केला आहे. या राजकीय पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी खालील प्रमाणे आहेत.

अध्यक्ष :- श्री. मनिष सुभाष गायकवाड
सचिव :- श्री. जॉनसन रोनाल्ड दंडीन
खजिनदार :- श्री. दिपक शिवानंद भूस्तळी

जर कोणाला "जनहित सेवा पक्ष" या राजकीय पक्षाच्या नोंदणीबाबत आक्षेप असल्यास तो पंधरा दिवसाचे आत लेखी स्वरूपात "सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र. पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०००३२, यांच्याकडे परस्पर नोंदवावा, त्यात आपला संपर्काचा अचूक पत्ता. दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**अध्यक्ष**
**श्री. मनिष सुभाष गायकवाड**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ६२६/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर एम.पी.मर्ढेकर सो, सोलापूर यांचे न्यायालयात**

१) प्रतिक्षा गणेश इंगोले,वय-२४ वर्षे,धंदा-घरकाम
२) स्वराज गणेश इंगोले,वय-०३ वर्षे, धंदा-कांही नाही (करीता अ.पा.क.आई म्हणून अर्जदार नं.१)
३) विराज गणेश इंगोले,वय-८ महिने,धंदा-कांही नाही (करीता अ.पा.क.आई म्हणून अर्जदार नं.१) } अर्जदार
४) सुनिता भैरवनाथ इंगोले,वय-४९ वर्षे, धंदा- घरकाम
सर्व रा.मु.पो.कर्देहळ्ळी,ता.दक्षिण सोलापूरजिल्हा सोलापूर

**विरूध्द**

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी कै.गणेश भैरवनाथ इंगोले याचे अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे

त्याअर्थी सदरचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना देवविणेबाबत कोणाची कांही हरकत असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा या अर्जाची पुढील नेमलेली तारीख१५/९/२०२५ रोजी स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत कागदोपत्रानिशी नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची कांही हरकत न आल्यास सदर अर्जाकामी मे. कोर्ट पुढील हुकूम करतील, त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज वार ५ दिनांक माहे ०८ इसवी सन २०२५ रोजी आमच्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले.

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ५८२/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन मे.एस.डी.गावडे सो यांचे कोर्टात**

१) श्री. विजय सीताराम मामड्याल वय ७५ वर्षे, धंदा- व्यापार, रा. ४८०/८१, साखर पेठ, सोलापूर-४१३००५. }अर्जदार
२) सुशिलाबाई आगय्या मामड्याल वय- ८९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. ४७१, साखर पेठ, सोलापूर-४१३००५.
३) राजू आगय्या मामड्याल वय : ५९ वर्षे, धंदा : व्यापार, रा. ४७१, साखर पेठ, सोलापूर-४१३००५.

**विरुध्द**

कोणीही नाही }सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात हिंदू वारसा कायदा कलम ३७२ अन्वये सेक्शन सर्टिफिकेट मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे आजोबा व अर्जदार क्र. २ हिचे सासरे रामय्या रंगय्या मामड्याल हे दि. १२/०९/१९६२ रोजी व तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांची आजी व अर्जदार क्र.२ हिची सासू लछव्वाबाई रामय्या मामड्याल हिचे दि. १६/१०/१९६१ रोजी व अर्जदार क्र.१ चे वडील अर्जदार क्र.२ हिचे दिर व अर्जदार क्र.३ यांचे काका सिताराम रामय्या मामड्याल हे दि.०७/१२/१९७८ रोजी व अर्जदार क्र.१ यांची आई, अर्जदार क्र. २ हिची जाऊ व अर्जदार क्र. ३ यांची काकू भुमव्वाबाई सिताराम मामड्याल हिचे दि. १६/१२/२००९ रोजी व अर्जदार क्र. १ यांचे काका, अर्जदार क्र.२ हिचे पती व अर्जदार क्र.३ चे वडील आगय्या रामय्या मामड्याल हे दि.२७/०२/१९७२ रोजी मरण पावले.. अर्जदार यांनी मयत रामय्या रंगय्या मामड्याल यांचा वारसाचा दाखला (इंडियन सक्सेशन सर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना इंडियन सक्सेशन ॲक्ट कलम ३७२ अन्वये सेक्शन सर्टिफिकेट (इंडियन सक्सेशन सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसली हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख ११/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी. आज दि.४ माहे ८ / २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक सि.ज.सि.डि. सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

जन्म-मृत्यु नोंद अर्ज नं. ३९/२०२५

**मोहोळ येथील मा.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सो, यांचे कोर्टात,**

स्वप्ना सुरेश काकडे, वय - ३७ वर्षे, धंदा- नोकरी, रा.पोखरापूर,मोहोळ,ता. मोहोळ, जि. सोलापूर. मो. ९८२३७१०२९२. }अर्जदार

**विरुध्द**

ग्रामपंचायत, पोखरापूर, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. . ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पोखरापूर, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.) }सामनेवाला

जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज- ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचा जन्म दि. १०/०६/१९८७ रोजी मौजे पोखरापूर, ता. मोहोळ येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद मौजे पोखरापूर, येथील ग्रामपंचायत, पोखरापूर मध्ये जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदाराचे आई मजुरी व शेती कामामध्ये व्यस्त अर्जदारच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांना व्हावा,अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे.

त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे स्वप्ना सुरेश काकडे यांचा जन्म दि. १०/०६/१९८७ रोजी झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत, पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर, यांच्या जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द तीस दिवसांचे आत अगर सदर अर्जाचे कामी नेमलेली दिनांक-२२/०८/२०२५ रोजी आपली स्वतः अगर विधिज्ञ मार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन, ग्रामपंचायत, पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांना स्वप्ना सुरेश काकडे यांचा दि.१०/०६/१९८७ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

(शिक्का) **हुकूमावरुन तहसिलदार**